# कविता

## आमचे मंडळ...मराठी कला मंडळ!

'BMM'च्या विशेष वृत्ताने दिली मनाला स्फूर्ती,
विचार आला की राजधानीतल्या मंडळाची झाली पस्तीस वर्षे पूर्ती.

व्हर्जिनिया-मेरीलन्ड-डी.सी. करांनी संस्था ही घडविली,
'बिल-ऑफ-राईट्स' सारखी हक्काची 'कॉनस्टिट्यूशन'ही लिहिली,
अन् पन्नास सभासदांची आता पाचशेहून अधिक कुटुंबे सहज
गणली.

'मराठी कला मंडळ' नावे उत्साहाला आला पूर,
आमच्या मनाला त्यातच मिळाला ताल आणि सूर,
'बेल्टवे'च्या आत 'बेल्टवे'च्या बाहेर संख्या आमची भरपूर.

नववर्षाच्या थंडीला आमच्या तिळगुळाची गोडी,
स्नेहभेटीच्या सोहळ्याने आम्ही नवीन ओळखी जोडी,

फाल्गुन-चैत्राच्या संगतीला 'पोटोमॅक' तिरी फुलावा,
तो मोहक रंगीत चेरी ब्लासमचा देखावा,
स्प्रिंगच्या नवपालवीसमवेत झळकावा होळी व गुढीपाडवा.

'रेड-व्हाईट-ब्लू' रंगाचे जरी आम्हीही अभिमानी,
तरी भगवा झेंडा महाराष्ट्राचा आठवतो आम्ही मनी,
आणि 'मे' आला कि विजयतुतारी सहर्ष वाजवतो महाराष्ट्र-दिनी.

कॉंग्रेसची 'रिसेस' सुरु झाली कि आम्ही सुट्टीला राजी,
तरी उन्हाळ्यात पिकनिकची आमच्या खावी मस्त पावभाजी.

आमच्या गावाचा विचार केला कि जरी समोर गज-गर्दभाची मूर्ती,
आवडत्या कार्यक्रमाला बाप्पाच्या आनंदाला येते भरती,
सुखकर्ता दुखहर्ता म्हणत करतो मोद्याने आरती.

'व्हाइट हाउस' मधील 'दीप प्रज्वलाने' झाली आमची कॉलर ताठ,
साड्या दागिने खरेदीचा मौका दिवाळीचा तर आगळाच थाट,
नाटक गाणे नृत्य चित्रपट ह्या कार्यक्रमाची सगळे बघतो वाट.

देश प्रांत तो दूर राहिला पण मन मायबोलीचे गीत गाते,
इवल्या रोपाचा वृक्ष वाढवून मायभूमीशी फुलवले आम्ही नाते.

**- अमिता गोखले (वॉशिंग्टन डी. सी. )**